

# पुणे विद्यापीठ

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**
एम.एस.सी., पी.एच.डी.
संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ

संदर्भ क्र.: विकमं/२०१२–१३/७०४ दिनांक : ०५/०२/२०१४.

प्रति,
**मा. प्राचार्य / मा. संचालक/ मा. विभागप्रमुख,**
पुणे शहर व पुणे ग्रामीण विभागातील
सर्व संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्था.

**विषय:– पुणे शहर व पुणे ग्रामीण विभागातील विद्यापीठ प्रतिनिधी शिबिराबाबत.....**

महोदय/महोदया,

पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, बाबुरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी, पुणे ४११०२७ यांचे संयुक्त विद्यमाने १४ व १५ फेब्रुवारी, २०१४ या कालावधीत 'पुणे शहर व पुणे ग्रामीण विभागातील विद्यापीठ प्रतिनिधी' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/विद्यापीठांतील पदव्युत्तर विभागांतील विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधींस **गुरुवार, दि. १४ फेब्रुवारी, २०१४ रोजी सकाळी १० वाजता** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, बाबुरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी, पुणे ४११०२७ येथे वरील शिबिरासाठी उपस्थित राहणेबाबत सूचित करावे व सदर पत्र आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/विद्यापीठांतील पदव्युत्तर विभागाच्या सूचना फलकांवर प्रदर्शित करावे, ही विनंती.

कळावे,

सोबत : महाविद्यालयाचे पत्र.

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

**विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, गणेश खिंड, पुणे – ४११ ००७.**
**☎ ०२० – २५६०११५४ फॅक्स : ०२० – २५६०११५४ मोबाईल : ९८५०१७६५७५**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,

स्थापना : १९८९

PDEA
Pune District Education Association
बहुजन हिताय, बहुजन सुखाय।

# बाबुरावजी घोलप महाविद्यालय

कला, विज्ञान व वाणिज्य

सांगवी, पुणे - ४११ ०२७. (महाराष्ट्र) फोन : ०२०-२७२८०२०४ फॅक्स : ०२०-२७२८१७२२

इमेल : principal@bgcollege.com वेबसाईट : www.pdeabgcollege.com

पुणे विद्यापीठाशी संलग्न ( आयडी नं. पीयू/पीएन/एएससी/०७३/१९८९) महाराष्ट्र

नॅक पुर्नमुल्यांकन 'ब' श्रेणी

जावक क्र. : बी जी सी एस/ २१८/२०१३-१४

दिनांक : 4 FEB 2014

अध्यक्ष
अजित पवार

मानद सचिव
संदिप कदम

अध्यक्ष प्रतिनिधी
राजेंद्र घाडगे

खजिनदार
ॲड. मोहनराव देशमुख

उपसचिव
पी. ई. कुलकर्णी

सहाय्यक सहसचिव
प्राचार्य
डॉ. एम. जी. चासकर

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक---------
पुणे शहर व पुणे ग्रामिण विभागातील
सर्व सलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था

विषय :- विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी शिबिराबाबत......

महोदय,

पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, बाबुरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी यांच्या संयुक्त विद्यमाने **शुक्रवार दिनांक १४/०२/२०१४** व **शनिवार दिनांक १५/०२/२०१४** या दरम्यान दोन दिवसीय शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

सदर शिबिरामध्ये विद्यार्थ्यांमध्ये त्यांचे हक्क, कर्तव्य, सामाजिक जबाबदारी, स्त्री पुरुष समानता, समाजकार्य तसेच विद्यापीठाच्या विद्यार्थी हिताच्या विविध योजनांबददल जागरुकता निर्माण करण्याचा मानस आहे.

सदर शिबिरासाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदेचे ३ सदस्य, कमवा व शिका योजनेतील २ विद्यार्थी असे एकुण ५ विद्यार्थी **शुक्रवार दिनांक १४/०२/२०१४** रोजी **सकाळी १०.००** वाजेपर्यंत पाठवून सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासु

डॉ.एम.जी. चासकर
**प्राचार्य**
**बाबुरावजी घोलप महाविद्यालय**
**सांगवी, पुणे-२७**

संपर्क :- प्रा. विजय घारे ९८५०९७९१५५
( विद्यार्थी कल्याण अधिकारी )
इ-मेल :- gharevs@rediffmail.com